**भुजबळ नॉलेज सिटी**

**मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३**

**वाचन प्रेरणा दिन अहवाल २०१६**

**मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा**

**तारीख :- १५ ऑक्टोबर २०१६.**

**वेळ -: श्री. स्वानंद बेदरकर यांचे ‘ वाचन संस्कृती ‘ या विषयावर व्याख्यान सकाळी ११.०० वाजता.**

**ग्रंथ प्रदर्शन: सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत.**

**ठिकाण -: मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी.**

महाराष्ट्रशासनाच्या पुढाकाराने डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्म दिनानिमित्त १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. वाचन प्रेरणा दिना निमित्त मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन व वाचन संस्कृती या विषयावर श्री. स्वानंद बेदरकर, गावकरी वृतपत्र समूहाचे उपसंपादक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी प्रास्ताविक मांडले. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो तसेच मनुष्याचे विचारही सुदृड होतात व प्रगतीस चालना मिळते. वाचनाच्या सवयीमुळेच डॉ अब्दुल कलाम हे जगप्रसिद्ध शास्रज्ञ होऊ शकले असे श्री. स्वानंद बेदरकर यांनी नमूद केले. औषधनिर्माण शास्त्राच्या विद्यार्थ्यांना संशोधनामधील नवनवीन संधी उपलब्ध होऊ शकतात, तसेच अवांतर वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास होतो हे देखील त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास ८७ विध्यार्थी आणि २३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ग्रंथालय विभागामार्फत यानिमित्ताने पुस्तक परीक्षण याविषयीची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयात आलेल्या पुस्तक परीक्षणापैकी चौधरी तनया (एफ.वाय.बी.फार्म.), पियुष इंगळे (एस.वाय.बी.फार्म.) आणि कापसे अर्चना (एस.वाय.बी.फार्म.) यांनी उत्कुष्ट शैलीत पुस्तक परीक्षण सादर केले. विजेत्या विद्यार्थ्यांचा श्री. स्वानंद बेदरकर यांच्या हस्ते पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयातर्फे डॉ. दीपक भांबेरे यांनी आभार प्रदर्शन केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल श्री नितीन भामरे, उपग्रंथपाल आरती कागदे व ग्रंथालय सहायक कर्मचारी ज्योती जाधव तसेच इतर कर्मचार्यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता डॉ. सौ शेफाली भुजबळ व प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.

**कार्यक्रमाचे समन्वयक :-**

डॉ. दीपक भांबेरे (प्राध्यापक)

श्री. नितीन भामरे (ग्रंथपाल)

आरती कागदे (उपग्रंथपाल)

ज्योती जाधव (ग्रंथालय सहायक कर्मचारी)

# भुजबळ नॉलेज सिटी

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## <u>वाचन प्रेरणा दिवस २०१६</u>



*प्रमुख अतिथी श्री. स्वानंद बेदरकर यांचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर*



*वाचन प्रेरणा दिनानिमित्त माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना*



*प्रमुख अतिथी श्री स्वानंद बेदरकर यांनी वाचन संस्कृती या विषयावर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवृंद यांच्याशी संवाद साधतांना.*



*वाचन प्रेरणा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या पुस्तक परीक्षण स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करतांना प्रमुख अतिथी श्री. स्वानंद बेदरकर.*



*कार्यक्रमाला उपस्थित असलेले शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवृंद.*

*ग्रंथ प्रदर्शन पाहतांना शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवृंद.*



